RESEARCH FRONT

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

# शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील सराव पाठ प्रशिक्षणाबद्दल प्रशिक्षणार्थींच्या मतांचा अभ्यास व नवीन अभ्यासक्रमाची दिशा ठरविणे

**डॉ.अजयकुमार भीमराव पाटील**
सहाय्यक प्राध्यापक,
आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशन, सातारा.
मोबाईल नं. 9689328610
ई–मेल – rayatpatil45@yahoo.com

**डॉ.केशव रामभाऊ मोरे**
सहाय्यक प्राध्यापक,
आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशन, सातारा.
मोबाईल नं. 9890454633
ई–मेल – keshavmore.2010@rediffmail.com

कोणत्याही राष्ट्राची प्रगती ही तेथील शिक्षण प्रक्रियेवरती अवलंबून असते. शिक्षण प्रक्रियेची प्रगती तेथील शिक्षकांवरती अवलंबून असते. शिक्षण प्रक्रियेत सर्वात महत्त्वपूर्ण घटक म्हणजे शिक्षक होय. संपूर्ण शिक्षण प्रक्रियेला आकार देण्यामध्ये, शिक्षण प्रक्रियेची गुणवत्ता वाढविण्यामध्ये आणि शिक्षण प्रक्रियेची गुणवत्ता टिकविण्यामध्ये शिक्षकाची जबाबदारी महत्त्वपूर्ण असते. शिक्षण प्रक्रियेतील या महत्त्वपूर्ण घटकाला तयार करण्याचे, त्यांच्या व्यावसायिक व्यक्तिमत्त्वाला आकार देण्याचे व शिक्षकाची अध्यापनविषयक विचारप्रक्रिया विकसित करण्याचे काम शिक्षक–शिक्षणाचे असते.

शिक्षक–शिक्षणातून दर्जेदार शिक्षक तयार करण्यासाठी प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व व्यावसायिक इ. स्तरांसाठी वेगवेगळे शिक्षक–शिक्षण राबविले जाते. सर्वसाधारणपणे शिक्षक–शिक्षणाच्या सर्व स्तरांसाठी अभ्यासक्रमात सैद्धांतिक भाग, सराव पाठ प्रशिक्षण व इतर प्रात्यक्षिक कामे समाविष्ट केली आहेत. शिक्षक–शिक्षणाच्या अभ्यासक्रमातील सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजे सराव पाठ प्रशिक्षण होय. सराव पाठ प्रशिक्षण हा शिक्षक–शिक्षणाचा आत्मा समजला जातो. परंतु सध्या महाराष्ट्रात अनेक डी.एड्. व बी.एड्. महाविद्यालये सुरू आहेत. या महाविद्यालयांना सराव पाठ प्रशिक्षण पूर्ण करण्यासाठी शाळा उपलब्ध होत नाहीत. सराव पाठ पूर्ण करण्यासाठी कुठेतरी एखादी शाळा उपलब्ध असते. त्या उपलब्ध असणाऱ्या शाळेतच सराव पाठ पूर्ण केले जातात आणि सराव पाठ पूर्ण करण्याचा सोपस्कार पूर्ण केला जातो. बी.एड्. ची प्रवेश प्रक्रिया उशिरपर्यंत सुरू असते. त्यामुळे उपलब्ध वेळेत सर्व सराव पाठ पूर्ण करून घेणे बंधनकारक असते. आपल्या महाविद्यालयात चाललेली सराव पाठ प्रशिक्षण प्रक्रिया योग्य पद्धतीने चाललेली आहे का? त्या प्रक्रियेत काय त्रुटी आहेत का? ती प्रक्रिया आणखी सक्षम करता येईल का? आणि एकूणच शिक्षक–शिक्षण प्रक्रिया दर्जेदार बनविण्यासाठी काही हातभार लावता येईल का? त्यामुळेच महाविद्यालयातील सराव पाठ प्रशिक्षणाबद्दल प्रशिक्षणार्थींच्या मतांचा अभ्यास करून नवीन अभ्यासक्रमाची दिशा ठरविण्यासाठी सदरचे लघुसंशोधन केले आहे.

## संशोधनाची गरज

महाराष्ट्र शासनाने अनेक शिक्षणशास्त्र महाविद्यालयांना मान्यता दिल्या. मान्यता दिल्यानंतर शासनाचे व विद्यापीठाचे नियंत्रण या शिक्षणशास्त्र महाविद्यालयांवर असायला हवे; परंतु तशी परिणामकारक व्यवस्था उपलब्ध नाही. परिणामी अनेक महाविद्यालयांमध्ये प्रवेश जेवढ्या विद्यार्थ्यांनी घेतलेला आहे तेवढे विद्यार्थी महाविद्यालयात नियमित हजर नसतात. ते फक्त परीक्षेलाच येतात. प्रात्यक्षिक कार्याचे अहवाल अगोदरच्या मुलांचे पाहूनच पूर्ण करून देतात. त्यामुळे शिक्षक–शिक्षणाचा दर्जा कमी झाला आहे. अनेक महाविद्यालयांमध्ये फक्त कागदोपत्रीच सर्व पूर्ण केल्याचे दाखविले जाते; पण प्रत्यक्षात वस्तूस्थिती मात्र वेगळी असते. अशा महाविद्यालयांकडून मग कसली गुणवत्तेची अपेक्षा करणार? अशी महाविद्यालये प्रशिक्षणार्थींच्या व्यावसायिक व्यक्तिमत्त्वाला कसला आकार देणार? सराव पाठातून

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

प्रशिक्षणार्थींची अध्यापनासाठीची कसली विचार प्रक्रिया विकसित करणार? अनेक महाविद्यालयात फक्त अहवाल लेखन व फाईलपूर्तता करून घेतली जाते. अशा महाविद्यालयात प्रशिक्षणार्थींचे अध्यापनविषयक कौशल्ये कशी विकसित होणार? अध्यापन विषयक क्षमतांचा कसा विकास होणार? हे सर्व प्रश्न भेडसावत असल्यामुळे तसेच आपल्या महाविद्यालयात चाललेली सराव पाठ प्रशिक्षण प्रक्रिया योग्य पद्धतीने चाललेली आहे का? त्या प्रक्रियेत काय त्रुटी आहेत का? ती प्रक्रिया आणखी सक्षम करता येईल का? आणि एकूणच शिक्षक–शिक्षण प्रक्रिया दर्जेदार बनविण्यासाठी काही हातभार लावता येईल का? या सर्व प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी सदरच्या लघुसंशोधनाची गरज आहे.

## संशोधनाचे महत्त्व

1. सराव पाठ प्रशिक्षणातील अडचणी शिक्षणशास्त्र महाविद्यालयांना समजतील.
2. सराव पाठ प्रशिक्षणातील अडचणींवर उपाययोजना करता येतील.
3. सराव पाठ प्रशिक्षण कसे असावे हे शासनाला समजेल.
4. सराव पाठ प्रशिक्षण कसे राबवावे हे विद्यापीठाला समजेल.
5. सराव पाठ प्रशिक्षण कार्यक्रम अधिक परिणामकारक कसा राबवावा हे शिक्षणशास्त्र विद्याशाखेच्या अभ्यास मंडळाला समजेल.
6. नवीन अभ्यासक्रमात सराव पाठ प्रशिक्षण कसे असावे हे शिक्षणशास्त्र विद्याशाखेच्या अभ्यास मंडळाला समजेल.

## संशोधन विधान

शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील सराव पाठ प्रशिक्षणाबद्दल प्रशिक्षणार्थींच्या मतांचा अभ्यास व नवीन अभ्यासक्रमाची दिशा ठरविणे.

## संशोधनाची उद्दिष्टे

1. शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील सराव पाठ प्रशिक्षणाबद्दल प्रशिक्षणार्थींच्या मतांचा अभ्यास करणे.
2. शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थींना सराव पाठ प्रशिक्षणासाठी महाविद्यालयातून पुरविण्यात येणाऱ्या सोयीसुविधांचा अभ्यास करणे.
3. शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील सराव पाठ प्रशिक्षण परिणामकारक करण्यासाठी प्रशिक्षणार्थींच्या मतानुसार नवीन अभ्यासक्रम सुचविणे.

## संशोधनाची व्याप्ती व मर्यादा

1. सदर संशोधन आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशन, सातारा (ता.जि.सातारा) पुरते मर्यादित आहे.
2. सदर संशोधन सन 2013–14 या शैक्षणिक वर्षापुरते मर्यादित आहे.
3. सदर संशोधन फक्त सराव पाठ प्रशिक्षणापुरते मर्यादित आहे; सराव पाठ प्रशिक्षणातील सूक्ष्म अध्यापन, अभिरूप अध्यापन यांचा विचार केलेला नाही.

## संशोधनाची कार्यपद्धती

सराव पाठ प्रशिक्षणातील 24 पाठांपैकी जवळजवळ 20 सराव पाठांचे अध्यापन पूर्ण झाल्यानंतर प्रशिक्षणार्थींची सराव पाठ प्रशिक्षणाबद्दल मते काय आहेत व नवीन अभ्यासक्रमाची दिशा कोणती असावी हे जाणून घेण्यासाठी 26 प्रश्नांची एक प्रश्नावली तयार केली. सदर प्रश्नावली आझाद कॉलेज ऑफ

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

एज्युकेशन, सातारा येथील 80 प्रशिक्षणार्थींकडून भरून घेतली. त्यामध्ये 64 मुली व 16 मुलांचा समावेश होता. प्रश्नावलीच्या सहाय्याने संकलित केलेल्या माहितीचे विश्लेषण करण्यात आले.

## प्रश्नावलीच्या सहाय्याने संकलित केलेल्या माहितीचे विश्लेषण

प्रश्नावलीच्या सहाय्याने एकूण 80 प्रशिक्षणार्थींकडून संकलित केलेल्या माहितीचे विश्लेषण केल्यानंतर असे दिसून आले की,

1. अधिकाधिक (93.75%) प्रशिक्षणार्थींच्या मते, सराव पाठाची तयारी करण्यासाठी पुरेसा वेळ मिळतो.
2. अधिकाधिक (91.25%) प्रशिक्षणार्थींच्या मते, पाठ टाचण काढण्यासाठी प्राध्यापकांचे योग्य मार्गदर्शन मिळते.
3. निम्म्यापेक्षा जास्त (67.50%) प्रशिक्षणार्थींच्या मते, सराव पाठासाठी शाळेतील शिक्षकांचे मार्गदर्शन व शाळेतील विद्यार्थ्यांचा योग्य प्रतिसाद मिळतो.
4. बहुतांश (75.00%) प्रशिक्षणार्थींच्या मते, सराव पाठासाठी आवश्यक असणारे संदर्भ ग्रंथ व शैक्षणिक साहित्य महाविद्यालयातून मिळते.
5. निम्म्यापेक्षा कमी (37.50%) प्रशिक्षणार्थींच्या मते, सराव पाठासाठी आवश्यक असणारे शैक्षणिक साहित्य आम्ही स्वतः तयार करतो.
6. बहुतांश (87.50%) प्रशिक्षणार्थींच्या मते, सराव पाठासाठी दिलेला आशय समृद्ध करण्यासाठी फक्त पाठयपुस्तकाचाच वापर केला जातो.
7. निम्म्यापेक्षा अधिक (78.75%) प्रशिक्षणार्थींच्या मते, सराव पाठानंतर प्राध्यापकांकडून व सहाध्यायींकडून योग्य प्रत्याभरण मिळते व त्या प्रत्याभरणाचा पुढील सराव पाठासाठी फायदा होतो.
8. अधिकाधिक (88.75%) प्रशिक्षणार्थींच्या मते, सराव पाठ प्रशिक्षणाने व्यावसायिक व्यक्तिमत्त्वाला आकार मिळतो.
9. अधिकाधिक (91.25%) प्रशिक्षणार्थींच्या मते, सराव पाठ प्रशिक्षणातील अध्यापनाचा दर्जा घसरला नाही.

## निष्कर्ष

1. सराव पाठाची तयारी करण्यासाठी पुरेसा वेळ दिला जातो.
2. सराव पाठाचे टाचण काढण्यासाठी प्राध्यापकांकडून योग्य मार्गदर्शन मिळते.
3. सराव पाठासाठी शाळेतील शिक्षकांकडून योग्य मार्गदर्शन व शाळेतील विद्यार्थ्यांकडून योग्य प्रतिसाद मिळतो.
4. सराव पाठासाठी आवश्यक संदर्भ ग्रंथ व शैक्षणिक साहित्य महाविद्यालयातून मिळते.
5. सराव पाठासाठी एल.सी.डी.प्रोजेक्टर, इंटरनेट व लॅपटॉपचा वापर प्रशिक्षणार्थी करीत नाहीत.
6. सराव पाठासाठी दिलेला आशय समृद्ध करण्यासाठी फक्त पाठ्यपुस्तकाचाच वापर केला जातो.

## शिफारशी

1. सराव पाठासाठी आवश्यक शैक्षणिक साहित्य प्रशिक्षणार्थींनी स्वतः तयार करावे व त्याचा वापर सराव पाठासाठी करावा.
2. सराव पाठासाठी प्रशिक्षणार्थींनी एल.सी.डी. प्रोजेक्टर, इंटरनेट व लॅपटॉपचा वापर करावा.
3. सराव पाठासाठी पंचपदीचा वापर न करता वर्गातील विद्यार्थ्यांची स्थिती व कुवत पाहून अध्यापनात बदल करावा.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

4. सराव पाठासाठी दिलेला आशय समृद्ध करण्यासाठी फक्त पाठ्यपुस्तकांचा वापर न करता विविध संदर्भ ग्रंथ, इंटरनेट, प्राध्यापकांशी चर्चा व सहाध्यायांशी चर्चा करावी.

## संशोधनानुसार नवीन अभ्यासक्रमास दिशा

शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील सराव पाठ प्रशिक्षणाबद्दल प्रशिक्षणार्थींच्या मतानुसार व शिक्षक–शिक्षणाची सद्यःस्थिती विचारात घेता शिक्षक–शिक्षणाचा नवीन अभ्यासक्रम तयार करताना काळाशी सुसंगत असावा. शिक्षणामध्ये आलेल्या नवनवीन अध्यापन पध्दती, नवनवीन तंत्राचे पाठ अभ्यासक्रमात समाविष्ट करावेत. सर्वच पाठ परंपरेनुसार चालत आलेल्या अध्यापन पध्दतींचा वापर करून घेतले पाहिजेत असा अट्टाहास न करता विद्यार्थ्यांची वर्गातील स्थिती व कुवत लक्षात घेऊन त्यात बदल करण्याचा अधिकार प्रशिक्षणार्थींना असावा. पाठ टाचणाचे मार्गदर्शन त्या–त्या अध्यापन पध्दतीच्या प्राध्यापकांनीच करण्याची व्यवस्था असावी. सराव पाठाचे गुणदान प्रत्यक्ष पाठ टाचणात करण्याची व्यवस्था असावी.

भारत देशाला जर 2020 साली विश्वाचे नेतृत्व करायचे असेल, जगात महासत्ता बनायचे असेल तर आपले शिक्षक–शिक्षण सक्षम बनवायला हवे. जागतिक स्पर्धेत टिकून राहण्यासाठी शिक्षक–शिक्षणाच्या अभ्यासक्रमात बदल केला पाहिजे. दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण शिक्षक–शिक्षणावर भर दिला पाहिजे. सक्षम, चारित्र्यसंपन्न, कर्तृत्वसंपन्न, आचारशील शिक्षक निर्माण करणाऱ्यावर शिक्षक–शिक्षणात भर दिला पाहिजे. विद्यार्थी हा शिक्षणाचा केंद्रबिंदू मानून त्यानुसार अध्यापनात बदल केला पाहिजे. शिक्षक–शिक्षणात विद्यार्थ्यांचे मानसशास्त्र, मानसिक कुवत लक्षात घेऊन बदल करण्याची लवचिकता ठेवली पाहिजे. 'मागता येत नाही भीक, तर मास्तरकी शिक' असे म्हणण्याचे दिवस आता राहिलेले नाहीत. कारण शिक्षकाची एक चूक आख्खी पिढी बरबाद करते. म्हणून शिक्षक–शिक्षणातील सराव पाठ प्रशिक्षण या महत्त्वपूर्ण प्रात्यक्षिकावर जास्त भर देवून चांगला शिक्षक तयार करण्यासाठी शासन, संस्थाचालक, समाज, शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य व प्राध्यापक या सर्वांनी एकत्रित विचार करण्याची गरज आहे.

## संदर्भ

- पुणेकर माधव आणि निकोसे राजेंद्रकुमार (संपादित) (2012). शिक्षक–शिक्षण अंतरंग आणि आव्हाने. नाशिक : इनसाईट पब्लिकेशन्स.
- बापट,भा. गो. (1998). शैक्षणिक संशोधन. पुणे : नूतन प्रकाशन.
- भिंताडे,वि. रा. (1989). शैक्षणिक संशोधन पध्दती. पुणे : नूतन प्रकाशन.
- मुळे, रा. शं. व उमाठे, वि. तु. (1995). शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे. नागपूर : महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ प्रकाशन.
- Kothari,C. R. (2002). Research methodology, Methods and Techniques (2nd Ed.). New Delhi: Wishwa Prakashan.